**ठळक बातम्या**

- भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात ऐतिहासिक मुक्त व्यापार कराराची घोषणा / व्यापार, सुरक्षा, संरक्षण भागीदारी, गतीशिलता, आपत्ती जोखीम व्यवस्थापन आणि ग्रीन हायड्रोजन आदी करारांचा समावेश

- औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचं 'पीएम सेतू' योजनेंतर्गत आधुनिकीकरण करण्याच्या योजनेला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून, अर्थसंकल्प येत्या १ फेब्रुवारीला सादर होणार

**आणि**

- १९ वर्षाखालच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर सिक्स फेरीतल्या सामन्यात भारताचं झिम्बाब्वेपुढं विजयासाठी ३५३ धावांचं आव्हान

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँतिनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देयर लेन यांच्या झालेल्या शिष्टमंडळ स्तरावरील चर्चेनंतर भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात ऐतिहासिक मुक्त व्यापार कराराची घोषणा झाली. यात व्यापार, सुरक्षा, संरक्षण भागीदारी, गतीशिलता, आपत्ती जोखीम व्यवस्थापन आणि ग्रीन हायड्रोजन आदी करारांचा समावेश आहे.

**हा करार** ऐतिहासिक असून यामुळे शेतकरी तसंच सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योजकांना फायदा होईल, असं प्रधानमंत्री संयुक्त निवेदनात म्हणाले. यामुळे गुंतवणुकीला चालना मिळेल आणि जागतिक पातळीवर पुरवठा साखळी मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यामुळे भारत आणि युरोपियन युनियन

यांच्यातले संबंध अधिक दृढ झाले असून हे करार सामायिक समृद्धीसाठीचा आराखडा आहेत, असं सांगत हे करार जागतिक स्थिरतेसाठी आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातला मुक्त व्यापार करारामुळे उत्पादन आणि सेवा क्षेत्राला चालना मिळेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

**होल्ड बाईट मोदी**

हा करार एक ऐतिहासिक क्षण असून यामुळे युरोपियन युनियन आणि भारत यांच्या संबंधाचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे, आज भारत आणि युरोपियन युनियन एक विश्वासार्ह भागीदार म्हणून उभे आहेत, असं युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष एँतिनियो कोस्टा म्हणाले. तर भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात झालेला मुक्त व्यापर करार हा सर्व करारांची जननी आहे असं युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देयर लेन म्हणाल्या.

**<><><><><>**

राज्यातल्या आयटीआय, अर्थात औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचं 'पीएम सेतू' योजनेंतर्गत आधुनिकीकरण करण्याच्या योजनेला राज्य मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत मान्यता दिली. त्यानुसार पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे या जिल्ह्यांमधल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये या योजनेची अंमलबजावणी केली जाईल. पुढच्या टप्प्यात इतर संस्थांचा समावेश केला जाणार असल्याचं राज्य शासनाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित सूक्ष्म, लघु आणि मध्यम कंत्राटदार-उद्योजकांची प्रलंबित देयकं अदा करण्यासाठी ट्रेड्स प्लॅटफॉर्मची निर्मिती, धुळ्यातल्या जवाहर शेतकरी सहकारी सूतगिरणीचं पुनरूज्जीवन करण्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडे शिफारस, वेगवेगळ्या कारणांसाठी दिल्या जाणाऱ्या शासकीय जमिनीच्या भाडे पट्ट्याचा कालावधी ५९ वर्षांपर्यंत वाढवून देणं,

केंद्र सरकार किंवा राज्य शासनाच्या ताब्यातल्या शत्रू संपत्तीच्या विक्री-खरेदीसाठी मुद्रांक शुल्क माफ करणं इत्यादी निर्णयही आज मंत्रिमंडळानं घेतले.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणाऱ्या मेट्रो मार्गिका ८ ला आज मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ६६ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीच्या नाशिक शहर परिक्रमा मार्गासाठी एकूण ३ हजार ९५४ कोटी रुपयांच्या खर्चाला, तसंच गडचिरोली जिल्ह्यातल्या खनिज वाहतुकीसाठी नवेगाव मोरे - कोनसरी - मूळचेरा - हेदरी - सुरजागड महामार्गाच्या सुधारित  लांबीलाही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

<><><><><>

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात होत आहे. त्या पार्श्वभूमीवर महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर आणि कामकाजावर चर्चा करण्यासाठी, आज नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

२०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर केला जाणार आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा येत्या १३ फेब्रुवारीपर्यंत चालणार असून त्यात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावर चर्चा होईल. दुसरा टप्पा  ९ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत होणार असून त्यात अर्थसंकल्पावर चर्चा होईल असं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. अधिवेशनाचं कामकाज सुरळीत व्हावं याकरता सर्व पक्षांनी सहकार्य द्यावं असं  आवाहन त्यांनी  केलं.

<><><><><>

शाश्वत आणि सुरक्षित वाहतूक व्यवस्थेकरता नवोन्मेषी संशोधनाची गरज असल्याचं केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी म्हटलं आहे. वाहन तंत्रज्ञानाविषयी पुण्यात आयोजित आंतरराष्ट्रीय परिसंवादाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. आत्मनिर्भर भारत अभियानाच्या यशाकरता संशोधक आणि उद्योजकांनी अभिनव तंत्रज्ञान विकसित करावं असं आवाहन त्यांनी केलं. पर्यायी इंधन, विजेवरची वाहनं आणि वाहनांमधे सुरक्षिततेच्या अत्याधुनिक सोयीसुविधा या क्षेत्रात आत्मनिर्भरतेचं उद्दिष्ट ठेवावं असं ते म्हणाले.

**<><><><><>**

१९वर्षाखालच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज झिम्बाब्वेत बुलवायो इथं सुरु असलेल्या सुपर सिक्स फेरीतल्या सामन्यात भारतानं झिम्बाब्वेपुढं विजयासाठी ३५३ धावांचं आव्हान ठेवलं आहे. झिम्बाब्वेनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केल्यावर भारतानं आक्रमक सुरुवात करत ११ व्या षटकातच १०० धावा पूर्ण केल्या. मात्र त्याच षटकात, तडाखेबंद फलंदाजी करत असलेला वैभव सूर्यवंशी ५२ धावांवर बाद झाला. त्यामुळे धावगती मंदावली. विहान मल्होत्रा आणि अभिमन्यू कुंडू यांनी पाचव्या गड्यासाठी ११३ धावांची भागिदारी करत डाव सुस्थितीत आणला. अभिमन्यू कुंडू ६१ धावांवर बाद झाल्यावर, विहाननं एक बाजू लावून धरत डावाला आकार दिला. त्यानं नाबाद १०९ धावा केल्या. त्यामुळे भारताला निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून ३५२, अशी मोठी धावसंख्या उभारता आली.

**<><><><><>**

विद्यापीठ अनुदान आयोगाचे नवे दिशानिर्देश शैक्षणिक संस्थांमधे जातिभेदाधारित गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जारी केले असून त्यांचा गैरवापर होणार नाही अशी ग्वाही केंद्रसरकारने दिली आहे. शैक्षणिक संस्थांच्या परिसरात जातिभेदामुळे अन्याय किंवा इतर गैरवर्तन राखण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी समान संधी केंद्र,

समता समित्या, तक्रार निवारण यंत्रणा आणि चोवीसतास चालणाऱ्या हेल्पलाईन सुरु कराव्या  अशा सूचना आयोगाने १३ जानेवारीला जारी केल्या होत्या. त्यांचा गैरवापर होऊ नये ही केंद्र आणि राज्यसरकारची जबाबदारी असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितलं. हा विषय न्यायप्रविष्ट असून संविधानाच्या चौकटीतच सर्व कार्यवाही होईल असं ते म्हणाले.

**<><><><>**

बँकाचा कामकाजाचा आठवडा पाच दिवसांचा करावा या प्रमुख  मागणीसाठी आज सर्व राष्ट्रीयकृत आणि सार्वजनिक बँकांच्या कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा संप केला. या मागणीवर विचार झाला नाही तर बेमुदत संपावर जाण्याची तयारी असल्याचं आंदोलकांनी सांगितलं.

बँक कर्मचाऱ्यांनी आपल्या शाखांसमोर मागणीच्या समर्थनासाठी निदर्शनंही केली. **धुळ्यात** संपामुळे बँकेचे व्यवहार ठप्प झाले होते. शहरातल्या स्टेट बँक शाखेसमोर आंदोलनकर्त्यांनी एकत्र जमून घोषणाबाजी करत निदर्शनं केली. **लातूर** शहरात स्टेट बँकेसमोर आंदोलनकर्त्यांनी निदर्शनं केली. शहर आणि परिसरातले दोनशेहून अधिक बँक कर्मचारी यात सहभागी झाले होते.

**<><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेनसेक्स निर्देशांकांत आज दिवसअखेर ३२० अंकांची वाढ झाली आणि तो ८१ हजार ८५७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १२७ अंकांची वाढ नोंदवत २५  हजार १७५ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

बँकेचे बनावट व्हाउचर वापरून तब्बल १ कोटी ९ लाख रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार नांदेड इथल्या एसटी को-ऑपरेटिव्ह बँकेत उघडकीला आला आहे.

याप्रकरणी बँकेचे संचालक बालाजी शिंदे याच्यासह इतर ४१ बँक अधिकारी आणि कर्मचाऱ्याविरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

<><><><><>

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत  आज ३ वाजता संपली. राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गच्या १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. तर, ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात विदर्भात  किमान तापमानात किंचित वाढ झाली, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. आज राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. उद्या राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//